# मंत्रिपरिषद निर्णय

## २७ सप्टेंबर २०१६

## ( बैठक क्र. १०० )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | **मेट्रो मार्ग–२ ब आणि मेट्रो मार्ग–४ प्रकल्पांच्या एमएमआरडीएमार्फत अंमलबजावणीस मान्यता** | नगरविकास (१) |
| २ | अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना लाभ<br>**आता प्रत्येक वर्षी ७५ विद्यार्थ्यांना मिळणार परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती** | सामाजिक न्याय |
| ३ | **संस्थात्मक लवाद धोरण राज्यात लागू करण्यास मंजुरी** | विधि व न्याय |
| ४ | शासनाच्या महसूल वाढीसाठी निर्णय<br>**भाडेपट्टा करार संपुष्टात आलेल्या मालमत्तांचे अस्तित्वातील बाजारमुल्याच्या दरानुसार नूतनीकरण** | नगरविकास (२) |
| ५ | **मिरा–भाईंदर महापालिकेचे रूग्णालय आरोग्य विभागाकडे हस्तांतरित** | नगरविकास (२) |
| ६ | **अभय योजनेच्या लाभासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ** | वित्त |
| ७ | **नागपूरच्या भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालयास २० पदांच्या निर्मितीस मंजुरी** | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये |
| ८ | राष्ट्रपतींकडून शौर्यपदक मिळालेल्यांचा राज्याकडूनही गौरव : **सामान्य नागरीकास भारतीय सेनेतील जवानांप्रमाणे एकरकमी पुरस्कार व मासिक अनुदानाचा धोरणात्मक निर्णय** | सामान्य प्रशासन |
| ९ | **चांदा ते बांदा या योजनेसाठी  पदनिर्मिती करण्यास मान्यता** | नियोजन |

## मेट्रो मार्ग-२ ब आणि मेट्रो मार्ग-४ प्रकल्पांच्या एमएमआरडीएमार्फत अंमलबजावणीस मान्यता

मुंबईमधील दळणवळणाची सुविधा अधिक सक्षम, विस्तारित आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्यादृष्टीने महानगरामध्ये मेट्रोचे जाळे उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यास गती देण्यासाठी मेट्रो मार्ग-२ ब (डी.एन.नगर-मंडाळे) आणि मेट्रो मार्ग-४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) या दोन मेट्रो प्रकल्पांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) अंमलबजावणी करण्यास आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

आज मान्यता देण्यात आलेला मेट्रो-२ ब हा मार्ग डी.एन.नगर ते मंडाळे असा २३.६४३ कि.मी. लांबीचा असून यादरम्यान २२ स्थानके आहेत. तसेच मेट्रो-४ हा मार्ग वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली असा ३२.३२ कि.मी. लांबीचा असून यादरम्यान ३२ स्थानके आहेत. मेट्रो मार्ग-२ (दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द) चा भाग असलेल्या मेट्रो मार्ग टप्पा क्र-२ ब या प्रकल्पाच्या पूर्णत्वाची एकूण किंमत १० हजार ९८६ कोटी आणि मेट्रो मार्ग-४ या प्रकल्पाच्या पूर्णत्वाची एकूण किंमत १४ हजार ५४९ कोटी रकमेस मान्यता देण्यात आली. या दोन्ही मेट्रो मार्गांची अंमलबजावणी मेट्रो कायदा २००९ (सुधारित) नुसार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दोन्ही प्रकल्पांची अंमलबजावणी प्राधिकरणाकडील स्वत:चा निधी आणि आंतरराष्ट्रीय, आंतर्देशीय किंवा इतर व्दिपक्षीय, बहुपक्षीय वित्तीय संस्थेकडून कर्ज सहाय्यानुसार करण्यात येईल. मात्र, त्याचे कोणतेही दायित्व किंवा जबाबदारी राज्य शासनावर येणार नाही या अटीवर एमएमआरडीएला मान्यता देण्यात आली. या प्रकल्पांपैकी मेट्रो-२ ब साठी ३७२७ कोटी एमएमआरडीएकडून, १२७४ कोटी शासकीय जमीन रुपाने, १२९६ कोटी राज्य शासनाकडून व्याजी दुय्यम कर्ज व ४६९५ कोटी ADB कर्ज सहाय्य अशा प्रकारे अर्थसहाय्य उभारण्यात येणार आहे. तसेच मेट्रो-४ साठी ६९४० कोटी एमएमआरडीएकडून, १२७४ कोटी, ३६९३ कोटी राज्य शासनाकडून व्याजी दुय्यम कर्ज व ३९१६ कोटी कर्ज सहाय्य या सहभागानुसार प्राधिकरणातर्फे भागभांडवल पूर्ण करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

दोन्ही मेट्रो मार्गाच्या प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या खालील प्रवासी भाडे दरास मान्यता देण्यात आली.

| **अंतर (कि.मी.)** | ०-३ | ३-१२ | १२-१८ | १८-२४ | २४-३० | ३०-३६ | ३६-४२ | >४२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भाडे (रु.)** | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० |

तसेच उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार वापरण्यास एमएमआरडीए किंवा प्राधिकरणास प्राधिकृत करण्यास आणि त्या प्रमाणे भाडे निश्चिती बाबतची जबाबदारी एमएमआरडीएची राहील यास मान्यता देण्यात आली.

शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पांतर्गत प्रकल्पबाधितांचे (PAP) पुनर्वसन व पुनर्वसाहत बहुपक्षीय, आंतरराष्ट्रीय बँक किंवा इतर आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेने सहमती दर्शविल्याप्रमाणे "मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP -R & R Policy)" नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात आली.

मेट्रो मार्ग २ ब प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभाल डेपोसाठी मंडाळे येथील जमीन व मेट्रो मार्ग ४ प्रकल्पाकरीता दुरुस्ती व देखभाल आगारासाठी ओवाळे येथील २० हे. व विक्रोळी येथील गोदरेजच्या ताब्यात असलेल्या १५.५ हे. जमीन वापरण्यास मान्यता देण्यात आली. तसेच उपलब्धतेनुसार व आवश्यकतेप्रमाणे इतर जमीन वापरात आवश्यक ते बदल करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, अतिरिक्त जमीन प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवासी/वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली.

हे दोन्ही मेट्रो प्रकल्प "निकडीचे सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली. या दोन्ही मेट्रो मार्ग प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली. मेट्रो प्रकल्प २ अ, २-ब, ७ आणि मेट्रो मार्ग-४ करीता मुंबई महानगर प्रदेशात प्रवाशांच्या सोयीसाठी प्राधिकरणामार्फत एकात्मिक तिकिटीकरण पद्धती (ITS) सुरू करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पांसाठी इतर मेट्रोप्रमाणे केंद्र शासनाचा निधी प्राप्त करून घेण्यासाठी पाठपुरावा करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना लाभ

**आता प्रत्येक वर्षी ७५ विद्यार्थ्यांना मिळणार**
**परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती संख्येत २५ ने वाढ करून आता प्रत्येक शैक्षणिक वर्षात ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

परदेशात उच्च शिक्षणाची संधी देणे, त्यांच्या गुणवत्तेत वाढ करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन उच्च विद्याविभूषित होण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीसाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये १३२ विद्यार्थ्यांकडून मुदतीत अर्ज करण्यात आले असून त्यापैकी ४९ पात्र विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. प्रत्येक वर्षासाठी केवळ ५० विद्यार्थ्यांची कमाल मर्यादा असल्यामुळे शिष्यवृत्तीच्या सर्व निकषांमध्ये आणखी ५० विद्यार्थी पात्र ठरुनही त्यांना शिष्यवृत्ती मिळू शकली नाही. त्यामुळे अनुसूचित जातीचे गरीब विद्यार्थी पात्रता, योग्यता व क्षमता असूनही परदेशातील उच्च शिक्षण, तंत्रज्ञान व संशोधनाच्या संधीपासून वंचित राहतात.

त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील परदेशी शिष्यवृत्तीसाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी संख्या ५० वरुन ७५ करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच चालू वर्षात ४९ विद्यार्थ्यांची निवड पूर्ण झालेली असल्याने प्राप्त अर्जांमधूनच उर्वरित विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यांच्या निवडीचे अधिकार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास देण्यात आले आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी व दर्जावाढीसाठी आवश्यक असलेले शिथीलीकरण करण्याचे अधिकार पुणे येथील समाजकल्याण आयुक्तांना देण्याचा देखील निर्णय घेण्यात आला.

-----०-----

## संस्थात्मक लवाद धोरण
## राज्यात लागू करण्यास मंजुरी

विविध संस्थांच्या व्यावसायिक-वित्तीय तंट्यांच्या निवारणासाठी संस्थात्मक लवाद हे प्रभावी माध्यम ठरावे यासाठी संस्थात्मक लवाद धोरण (Draft Policy for Arbitration) राज्यास लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषद बैठकीत झाला. त्यामुळे अशा स्वरुपाचे तंटे निवारण्यासाठी लागणारा अतिरिक्त वेळ आणि पैसा वाचण्यास मदत मिळणार आहे. तसेच या क्षेत्रातील जास्तीचा न्यायालयीन हस्तक्षेपही कमी होण्यास मदत होणार आहे.

केंद्र शासनाने लवाद कामकाजात होणाऱ्या जास्तीच्या न्यायिक हस्तक्षेपाची दखल घेऊन सर्वसामान्य जनतेला समजेल अशा संस्थात्मक लवादाच्या स्थापनेवर भर दिला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून अशा स्वरूपाच्या लवादांची गरज अधोरेखित केले आहेत. त्यामुळे संस्थात्मक लवादास तंटा निवारण्यासाठीचे अधिमान्य माध्यम म्हणून प्रोत्साहीत करून त्याच्या उन्नती व प्रसारासाठी संस्थात्मक लवाद धोरण लागू करण्यास मंजुरी देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. भविष्यात मुंबईसह महाराष्ट्रातील वाढत्या आर्थिक गतिविधींच्या पार्श्वभुमीवर हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

या धोरणानुसार ज्या करारनाम्यांचे व्यावसायिक मूल्य पाच कोटी रूपये किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा सर्व शासकीय करारात संस्थात्मक लवाद कलम अंतर्भूत करण्यात येणार आहे. त्यामुळे हा वाद भारतीय लवाद संस्थेकडे संदर्भित करता येईल. सध्या अस्तित्वात असणाऱ्या संविदा व करारनाम्यात, अन्य पक्षकारांच्या संमतीने वाद निराकरणासंदर्भात अस्तित्वात असलेल्या कलमांमध्ये योग्य त्या सुधारणा करून नवे कलम समाविष्ट करण्यात येईल, त्यामुळे वाद लवाद संस्थेकडे संदर्भित करता येतील. लवादास आरंभ झालेल्या अथवा आरंभ होणार आहे, अशा प्रकरणांसुद्धा पक्षकारांना प्रस्तावित संस्थात्मक लवाद यंत्रणेच्या पर्यायाकडे वळता येईल.

शासनाची मान्यता मिळण्याकरिता लवाद संस्थेस वाद सोडविण्यासाठी जागतिक पातळीवरील सर्वोत्तम प्रघात असलेले आणि न्यायोचित, किफायतशीर व कालमर्यादेत वाद निराकरण करणारे नियम तयार करावे लागतील. तसेच लवाद संस्थांना शासनाच्या मान्यतेसाठी ती भारतीय कायद्यानुसार कायदेशीर अस्तित्व असलेली असावी व तिचे मुख्यालय महाराष्ट्रात नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. लवाद संस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची सुनावणीची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. लवाद संस्थेने नियुक्त करावयाचे लवाद हे उच्च गुणवत्ताधारक, अत्युच्च प्रामाणिकपणा व विशेष ज्ञान असणारे असले पाहिजे. लवाद केंद्राकडे सर्वोत्तम विशेष कौशल्य आकर्षित करण्यासाठी, लवाद केंद्र न्याय्य व पारदर्शक कार्यपध्दती विकसित करील. लवाद संस्थेसाठी आवश्यक ते पायाभूत सहाय्य, उत्तम दर्जाची माहिती व तंत्रज्ञान व्यवस्था तसेच पोषक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासन सहाय्य करेल.

महाराष्ट्र शासन जरी मान्यताप्राप्त लवाद संस्थांच्या संर्वधनात व प्रगतीत पूर्णपणे सहभागी असले तरी देखील लवाद संस्थाच्या कामकाजाच्या स्वातंत्र्यावर व निप:क्षपातीपणावर परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

-----०-----

<u>शासनाच्या महसूल वाढीसाठी निर्णय</u>

## भाडेपट्टा करार संपुष्टात आलेल्या मालमत्तांचे अस्तित्वातील बाजारमुल्याच्या दरानुसार नूतनीकरण

मुंबई महापालिका अधिनियमाच्या अनुसूची "डब्ल्यू" मधील मालमत्तांच्या भाडेपट्ट्याचा कालावधी संपुष्टात आलेल्या मालमत्तांचे जुन्या दराने मानीव नूतनीकरण केल्यास शासनाच्या महसुलाची हानी होऊ शकते. त्यामुळे भाडेपट्टा करार संपुष्टात आल्याच्या लगतच्या दिनांकापासून अस्तित्वात असलेल्या बाजामुल्याच्या दरानुसार ३० वर्षांसाठी आकारणी करून मालमत्तांच्या भाडेपट्टा कराराचे नूतनीकरण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

बृहन्मुंबई महापालिकेकडील अनुसूची "डब्ल्यू" मध्ये एकूण १६० मालमत्तांचा समावेश आहे. या निर्णयानुसार भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनीचे मुल्य काढताना मुद्रांक शुल्क विभागातर्फे दरवर्षी प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यावर (रेडी रेकनर) आधारित भाडेपट्ट्याची आकारणी करण्यात येणार आहे. भाडेपट्ट्याच्या दरात सुधारणा करण्याचा कालावधी १० वर्षांपर्यंतचा करण्याबाबत तसेच अनुसूची "डब्ल्यू" मधील मालमत्तांच्या भाडेकरारापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील विशिष्ट रक्कम शासनास देण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ९१ब(३) व ९१ब(४) मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

-----०-----

नगर विकास विभाग (२)

## मिरा-भाईंदर महापालिकेचे रूग्णालय आरोग्य विभागाकडे हस्तांतरित

मिरा-भाईंदर महापालिकेचे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रूग्णालय (टेंबा रूग्णालय) शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यास आज झालेल्या मंत्रिपरिषद बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मिरा-भाईंदर महापालिकेतर्फे २०० खाटांच्या क्षमतेचे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रूग्णालय बांधण्यात आले असून ते टप्प्याटप्प्याने सुरू करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. मात्र, हे रूग्णालय पूर्ण क्षमतेने चालविण्याची महापालिकेची आर्थिक ताकद नाही. त्यामुळे रूग्णालय शासनाकडे हस्तांतरित करण्याचा ठराव महापालिकेच्या आमसभेने मंजूर केला आहे. मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्राची लोकसंख्या आठ लाखाहून अधिक असून यामध्ये सर्वात जास्त संख्या मध्यमवर्गीय नागरिकांची आहे. तसेच मुंबई-अहमदाबाद (घोडबंदर ते तलासरी) दरम्यान शासनाचे एकही सुसज्ज रूग्णालय नसल्याने मिरा-भाईंदरमधील रूग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू होण्याची गरज आहे. त्यामुळे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रूग्णालय शासनाकडे हस्तांतरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली.

आजच्या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाकडील सक्षम वैद्यकीय यंत्रणेच्या माध्यमातून भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयामार्फत दर्जेदार वैद्यकीय उपचार सुविधा आणि विशेषज्ञ वैद्यकीय तज्ज्ञांच्या सेवा उपलब्ध होणार आहेत. परिणामी मिरा-भाईंदर शहर, वसई-विरार शहर आणि त्या भागातील आसपासच्या ग्रामीण परिसरातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण वैद्यकीय उपचार सुविधा उपलब्ध होऊन

एकंदरीत रुग्ण सेवा व वैद्यकीय उपचाराचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे. रूग्णालयात सध्या सेवारत असलेल्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांना शासनाकडे समावेशन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मात्र, ज्या अधिकाऱ्यांचे किंवा कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यात येणार आहे त्यांची नियुक्ती विहित मार्गाने झाली असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांचे ज्या दिवशी शासन सेवेत समावेशन होईल, तो दिनांक शासकीय सेवेतील नियुक्तीचा दिनांक समजण्यात येईल. रूग्णालयाच्या हस्तांतरणानंतर रूग्णालयावर होणाऱ्या पंचवीस कोटी रूपये इतक्या आवर्ती खर्चास मंजुरी देण्यात आली.

-----o-----

वित्त विभाग

**अभय योजनेच्या लाभासाठी**
**१५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ**

विक्रीकराबाबतच्या प्रलंबित प्रकरणांसाठी महाराष्ट्र विवादित थकबाकी तडजोड अधिनियम-२०१६ अंतर्गत कलम २, ४ व ५ मध्ये सुधारणा करुन अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी अटींची पूर्तता करण्याचा कालावधी ३० सप्टेंबर २०१६ वरुन १५ नोव्हेंबर २०१६ पर्यंत वाढविण्यासाठी अध्यादेश काढण्यास आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये अनेक वर्षे अडकून पडलेल्या विक्रीकराचा महसूल उपलब्ध होऊन त्याचा कल्याणकारी योजनांसाठी उपयोग होण्यासाठी विक्रीकर विभागामार्फत अभय योजना सुरू करण्याचे यंदाच्या अर्थसंकल्पीय भाषणात जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र विवादित थकबाकी तडजोड अधिनियम-२०१६ संमत करण्यात आला. त्यातील कालावधीत करण्यात येणाऱ्या वाढीसाठी करावयाच्या बदलाच्या प्रारुपास देखील बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये

**नागपूरच्या भौतिकोपचार व व्यवसायोपचार**
**महाविद्यालयास २० पदांच्या निर्मितीस मंजुरी**

नागपूर येथील शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या मानकानुसार आवश्यक असणाऱ्या २० पदांच्या निर्मितीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

नागपूरच्या या महाविद्यालयात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आवश्यक पदे नव्याने निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने ठरवून दिलेल्या मानकानुसार प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, अभिलेखापाल, ग्रंथपाल, वरिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ लिपिक अशा एकूण २० पदांची निर्मिती करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच मंजूर पदांसाठी १९४.८८ लाख रूपयांच्या आवर्ती खर्चास मंजुरी देण्यात आली.

-----o-----

राष्ट्रपतींकडून शौर्यपदक मिळालेल्यांचा राज्याकडूनही गौरव

**सामान्य नागरीकास भारतीय सेनेतील जवानांप्रमाणे**
**एकरकमी पुरस्कार व मासिक अनुदानाचा धोरणात्मक निर्णय**

राष्ट्रपतींकडून शौर्यपदक मिळालेल्या राज्यातील सामान्य नागरीकास देखील भारतीय सेनेतील जवानांप्रमाणे एकरकमी पुरस्कार व मासिक अनुदान देण्याचा धोरणात्मक निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

भारतीय सैन्य दलातील राष्ट्रपती शौर्यपदक प्राप्त जवानांना किंवा त्यांच्या विधवा-अवलंबितांना एकरकमी पुरस्कार व मासिक अनुदान देण्याची तरतूद आहे. लष्करी जवानांप्रमाणेच राज्याचा अधिवासी असलेल्या सामान्य नागरीकास राष्ट्रपतींकडून अशोक चक्र, किर्ती चक्र, शौर्य चक्र असे शौर्य पुरस्कार मिळाले असल्यास त्यांना किंवा त्यांच्या विधवा, विधुर किंवा अवलंबितांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेंतर्गत एकरकमी पुरस्कार व मासिक अनुदान देण्याचा निर्णय आज घेण्यात आला. तसेच माजी सैनिकांच्या मुला-मुलींना देण्यात येणारी शैक्षणिक शुल्क माफीची सवलत मरणोत्तर शौर्यपदक प्राप्त शहीद व्यक्तीच्या दोन अपत्यांसाठी मंजूर करण्यात आली आहे.

मार्च २००८ मध्ये यवतमाळ येथील एका घटनेत संजय भाऊराव शिंदे या रिक्षाचालकाने लुटमार करणाऱ्यांना अटकाव करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी लुटारूंनी केलेल्या हल्ल्यात ते मृत्यूमुखी पडले. या धाडसाबद्दल शिंदे यांना मरणोत्तर शौर्यपदक प्रदान करण्यात आले होते. त्यांच्या कुटुंबियांस एक विशेष बाब म्हणून एक रकमी पुरस्कार आणि मासिक वेतन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या पत्नीस पूर्वी देण्यात आलेली २ लाख ४५ हजार रुपये वजा जाता ७ लाख ५५ हजार रुपये मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच त्यांना मासिक अनुदान आणि त्यांच्या अपत्यास शैक्षणिक सवलत मंजूर करण्यात आली.

-----०-----

## चांदा ते बांदा या योजनेसाठी पदनिर्मिती करण्यास मान्यता

चंद्रपूर व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांत नैसर्गिक साधनसंपत्तीचा यथायोग्य वापर व्हावा यासाठी विशेष पथदर्शी कार्यक्रम (रिसोर्स बेस्ड इंटेंसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट) राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत चांदा ते बांदा या योजनेसाठी आवश्यक पदनिर्मिती करण्यास आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

चांदा ते बांदा ही योजना नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारित आर्थिक विकास करण्याची पथदर्शी योजना असून या योजनेमध्ये उपलब्ध साधन संपत्ती व क्षेत्रांची निवड करून त्या क्षेत्रांचा सुक्ष्म आराखडा तयार करणे व त्या आधारे परिणामकारक अंमलबजावणी करणे हे योजनेचे स्वरुप आहे. यासाठी विविध शासकीय खाती, या जिल्ह्यांमध्ये काम करू इच्छिणाऱ्या खाजगी कंपन्या, सामाजिक संस्था, सीएसआर फाऊंडेशन, खाजगी गुंतवणूकदार व उद्योजक, जिल्ह्यातील उत्पादक, बचत गट, मार्केटिंग व्यवस्था उपलब्ध करून देणाऱ्या कंपन्या आदींचा समन्वय साधून शाश्वत आर्थिक विकास करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. भविष्यात याच धर्तीवर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातही योजना राबविण्याचा विचार आहे.

चंद्रपूर व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये या पथदर्शी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी चांदा ते बांदा या योजनेसाठी प्रथमत: सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी राज्यस्तरावर राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व चंद्रपूर व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांसाठी जिल्हास्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या दोन्ही कक्षांसाठी अनुक्रमे ९ व १४ अशी एकूण २३ पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच या २३ पदांपैकी राज्यस्तरीय कक्षातील २ पदे व जिल्हास्तरीय कक्षातील ४ पदे याप्रमाणे ६ पदे शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने व उर्वरीत १७ पदे आऊटसोर्स पद्धतीने भरण्यास मंत्रिपरिषदेने मान्यता दिली आहे.

-----०-----